सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४७५/४९२/४७५/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

महत्वाचे

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/ ६१६ दिनांक : 16 JUL 2025

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय ,
मुंबई,पुणे,नाशिक,छत्रपती संभाजी नगर,अमरावती,नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विद्यमान तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक

१) २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/४१८, दिनांक २३.५.२०२५
२) २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/५०९, दिनांक १७.६.२०२५
३) २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/५४६, दिनांक ३०.६.२०२५

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या विद्यमान संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात आलेले आहे. तथापि अद्यापपर्यंत काही संस्थांनी त्यांची माहिती https://ugpg२५.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत केलेली नसल्याचे आढळून आलेले आहे.

तरी आपल्या विभागातील सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती वरील लिंकवर **दिनांक १८.७.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करण्याबाबत तात्काळ सूचना देण्यात याव्यात.** संस्थांनी सादर केलेली माहिती विभागीय कार्यालयांनी पडताळून ती त्वरीत अद्ययावत करावी. संस्थांकडून सदर लिंकवर माहिती सादर न केल्यामुळे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या प्रवेश फेरीत संस्थेचा समावेश न झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार असतील याची जाणीव संबंधित संस्थांना करुन देण्यात यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित
२. कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

F:\BUDAGE\2025-26\CET CELL ARA\Intake Approval Final Letter.docx